सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पत्ता :जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, साक्री रोड, नंदुरबार- 425412.
Website –htpp://gmchnandurbar.comE-Mail:- deangmchnandurbar@gmail.com
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.शावैमरुनं/भांडर /छपाई /2418 /२०२४ दिनांक:- 24 /०९/२०२४

# दरपत्रक मागणीपत्र

प्रति,

१.

२.

३.

**विषय:- दरपत्रक मोहोरबंद लिफाफे सादर करणे बाबत.**

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासुन नंदुरबार येथे नव्याने १०० विद्यार्थी प्रवेश क्षमेतेचे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय नंदुरबार येथे कार्यन्वित झालेले आहे. जिल्हा सामान्य रुग्णालय शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये हस्तांतरीत झाले असून रुग्णालयातील शरीरविकृती विभागा अंतर्गत असलेल्या रक्तकेंद्र विभागामध्ये रुग्णांच्या माहिती जतन करुन ठेवण्यासाठी तसेच इतर दैनंदिन कामकाजासाठी रजिस्टर, रिपोर्ट फॉर्म, विविध कार्ड व स्टिकर छपाई करुन खरेदी करणेकरीता तसेच आवक जावक विभागासाठी दैनंददिन कामकाजासाठी विविध साईजचे लिफाफे खरेदी करणेकरिता मोहोरबंद लिफाफे मागविण्यात येत आहे. छपाई व अनुषंगीक बाबीची यादी खालील प्रमाणे आहे. आपला मोहोरबंद दरपत्रकाचा लिफाफा विहित मुदतीत या कार्यालयाच्या आवक शाखेत खालील अटी व शर्तीनुसार सादर करावा.

| Sr.No. | Item | Type | Size | Color | Total Rate (with GST) |
|---|---|---|---|---|---|
| १ | Blood Donar Questionare Form | ४ pages (२ side Priting) pink paper | A४ size | Pink Paper | |
| २ | Blood demand form | १ page (१ side Red color priting) | A४ size | Red Color | |
| ३ | Donar Card | ३०० GSM (२ side Priting) | ३.५*५ Inch | Multi color | |
| ४ | Donar Certficate | २५० GSM ( १ Side Priting) | A४ Size | Multi color | |
| ५ | Blood Camp organiser Cert | ३५० GSM (२ side Priting) | A४ Size | Multi color | |
| ६ | Cross match Report with carban copy Book | २०० pages duplicate (२ side printing) Book | A५ size | Yellow/White | |
| ७ | Blood Group label with Sticker color code 4 typer | Sticker (Multi color 1 side Priting) | 3.5*5 Inch | Multi color | |
| ८ | Birthday Wishesh card | 350 GSM (2 side Printing) color paper | 10*7 Inch | Multi color | |
| ९ | Pamplet Blood Donar janjagruti | 170 GSM (2 side Priting) color paper | A5 size | Multi color | |
| १० | Involop | ---- | 12*5 Inch | Red color | |
| ११ | Involop | ----- | 12*10 Inch | Green color | |
| १२ | Involop | ----- | 14*10 Inch | Green color | |



Scanned with OKEN Scanner

## महत्त्वाच्या अटी व शर्ती

१) दरपत्रक मोहोरबंद लिफाफा दि.03 /10 /२०२४ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत कार्यालयास पोहचील या बेताने पाठवावे. जाहीर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही / ग्राह धरले जाणार नाही.

२) सुचना फलक / संस्थेच्या संकेतस्थळावर जाहीर नोटीसप्रमाणे इच्छुक कंपनीस देखील दरपत्रक मोहोरबंद लिफाफा सादर करण्याची मुभा देण्यात येत आहे.

३) दरपत्रक मोहोरबंद लिफाफा **"अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,नंदुरबार"** यांचे नावे विहित मुदतीत कार्यालयास सारद करावा. त्याचप्रमाणे दरपत्रक मोहोरबंद लिफाफयावर पुरवठा करावयाच्या वस्तु पुरवठा, लिफाफयावर डाव्या बाजूस "दरपत्रक" लिफाफा जमा करण्याचा दिनांक अंतिम दिनांक, दरपत्रक धारकाच्या नावाचा शिक्का इ. नमुद असणे आवश्यक आहे.

४) दरपत्रक मोहोरबंद लिफाफे ही दिनांक. 04 /10 /२०२४ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता मा.अधिष्ठाता यांच्या दालनात संस्थास्तरावर गठीत समितीसमोर उघडण्यात येतील. आपणास जर दरपत्रक मोहोरबंद लिफाफे उघडण्याच्या प्रक्रियेत सहभाग घ्यावयाचा असल्यास नियोजि वेळेत स्वखर्चाने उपस्थित राहावा.

५) दरपत्रकातील दर हे दि. ३१.०३.२०२५ पर्यत ग्राहय राहतील. करीता आपणास ग्राहय दरानेच वस्तुंचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

६) प्रस्तावित वस्तुकरीता दरपत्रकात आकारण्यात आलेल दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत. सर्वात कमी दराचे परपत्रक व वस्तुंचा दर्जा / गुणवत्ता उत्कृष्ठ असेल, अशाच दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

७) सदर वस्तुंची किंमत, जीएसटी कर व एकुण किंमत असे एकत्रितपणे दर्शविण्यात यावे. दरपत्रकात खाडाखोड करण्यात येवू नये.

८) दरपत्रक मोहोरबंद लिफाफयात सादर करावयचे दस्तऐवज:- अ) अधिकृत लेटरहेडवर दरपत्रक सादर करावे. ब) दुकानाचा परवाना/व्यावसाय नोंदणी प्रमाणपत्र. क) पॅन कार्डची प्रत. ड) अनुभव प्रमाणपत्र इ) जी.एस.टी.प्रमाणपत्र ई) आयकर विवरणपत्र उ) प्रत्येक पुरवठाधारकास केवळ एक दरपत्रक सादर करता येईल. खरेदी प्राधिका-यासोबत हितसंबंधचा संघर्ष नसल्याबाबत तसेच एकल दरपत्रक देण्याबाबत हमीपत्र (Undertaking) व सर्व अटी व शर्ती मान्य असल्याचे प्रमाणपत्र (सोबत प्रत संलग्न ), उक्त सर्व दस्तऐवज वैध (Valid) तसेच विहीत नमुन्यात असणे बंधनकारक असुन, सर्व दस्ताऐवज सिलबंद लिफाफयामध्ये सादर करणे आवश्यक आहे. सर्व दस्ताऐवज (Document Checklist) क्रमाने दरपत्रकासोबत संलग्नीत करावे.

९) सदर वस्तुंचा पुरवठा आदेश दिल्यानंतर दरपत्रक तसेच पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार वस्तुंचा पुरवठा विहित मुदतीत करणे आपणावर बंधनकारक राहील. विहित मुदतीत सोबत जोडलेल्या यादीनुसार व विनिर्दिष्ठेनुसार वस्तुंचा पुरवठा न केल्यास द्वितीय न्युनतम दरपत्रकधारकास पुरवठा आदेश देण्यात येतील.

१०) अपवादात्म परिस्थितीमुळे उक्त कोणत्याची अटीत आवश्यतेनुसार अंशत: बदल करणे अथवा प्राप्त झालेली दरपत्रके कोणतेही कारण न देता स्वीकारणे/नाकारणे, तसेच कोणत्याची स्तरावर खरेदीप्रक्रिया रदद करणे इ. अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,नंदुरबार.) यांनी राखुन ठेवलेले आहेत.

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
नंदुरबार.

प्रत:- १) नोटीस बोर्ड
२) वेबसाईट

Scanned with OKEN Scanner